# <u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. २८/२०१४ मधील नि. ६० वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा मयत प्रतिवादी क्र. ३ याचे वारस दाव्यामध्ये सामिल करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. सदर अर्जात नमुद असलेल्या मयत प्रतिवादी क्र. ३ याची पत्नी व मुलगा यांचे विशवाय त्यांना इतर कोणीही वारस नाहीत असे वादीने नमुद केले आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी याने हरकत घेतलेली असून त्याच्या मते प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दावा अबेट झाल्यामुळे हा अर्ज चालण्यास पात्र नाही असे त्याचे म्हणणे आहे.

३. दोन्ही बाजुंच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा हक्क प्रस्थापनेसाठी व मनाईसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ याना दाव्यामध्ये सामिल करुन घेतले होते. सबब ते दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना दाव्याचे कामी सामिल करुन घेण्यात आले. प्रस्तुतचा अर्ज पाहता तो ३ दिवसांनी दाखल केलेला आहे. मात्र त्या तांत्रिक कारणासाठी म्हणजे ३ दिवसांच्या विलंबाकरीता प्रतिवादी क्र. ३ विरुध्दचा अबेटमेंटचा आदेश रद्द करायला हवा असे मला वाटते. सबब मल खाली आदेश पारित करतो.

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ३ च्या वारसांना दाव्याचे कामी त्वरीत सामिल करुन घेण्यात यावे.

सही/—

दिनांक— २२/११/२०१७

(वि. द. पाटील)

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.